७ दैनिक जनप्रवास सांगली
■ सोमवार, दि. १९ ऑगस्ट २०१९
Website : janpravas.in

# महाडिक शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्यदिन साजरा

**इस्लामपूर ● प्रतिनिधी**

पेठ (ता. वाळवा) येथील श्री व्यंकटेश्वरा शिक्षण संकुलात स्वातंत्र्यदिन साजरा झाला. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे नवनियुक्त प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

संस्थेचे कार्यकारी संचालक प्रा.महेश जोशी म्हणाले, यशस्वी राष्ट्रनिर्मितीमध्ये प्रगत तंत्रज्ञान व कुशल मनुष्यबळाचा मुख्य वाटा असून आजच्या युगातील आव्हाने व नैसर्गिक आपत्तीमध्ये सामाजिक



व्यंकटेश्वरा शिक्षण संकुलात ध्वजारोहन करताना प्राचार्य डॉ.व्ही.ए.कुलकर्णी.

भान ठेवणे गरजेचे आहे. प्राचार्य डॉ.कुलकर्णी म्हणाले, आधुनिक काळात कोणत्याही क्षेत्रांत कार्यरत असताना प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे असून राष्ट्रीय कर्तव्ये योग्य रीतीने पार पडणे ही महत्वाची बाब आहे. यावेळी महाडिक मल्टीस्टेट क्रेडीट सोसायटीचे चेअरमन सतीश महाडिक, व्यवस्थापक आर.एम.बागडी, संस्थेचे संचालक राजाराम गायकवाड, पब्लिक स्कूलच्या प्राचार्य डॉ.कृष्णमुर्ती, बी.एस्सी. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.वैशाली माने यांची प्रमुख उपस्थिती होती. विजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेच्या अभियांत्रिकी, पदविका, आय. टी. आय, मॅनेजमेंट, पब्लिक स्कूल, ज्युनिअर कॉलेज, बी.एस्सी कॉलेज तसेच महाडिक मल्टीस्टेट क्रेडीट सोसायटीचे पदाधिकारी मान्यवर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.